दिनांक -०८/०६/२०२०

**भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलमं | ३९७/२०२० कलम ३२४,५०४ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | मथंन मनोहरराव दरोळी वय २२ वर्ष रा. बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा |
| घटनास्थळ | राम मेघे कॉलेज च्या पाठीमागे जुनी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | ०७/०६/२०२० चे ०८:०० वा |
| दाखल ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १४:५७ वा |
| आरोपी /जखमी चे नाव व पत्ता | शुभम अशोकराव दरोळी वय २४ वर्ष बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याचे दोन्ही आत्याच्या नावाने असलेल्या शेतामध्ये चक्कर मारण्या करीता गेला असता यातील आरोपीने हजर येवुन फिर्यादीस म्हटले की तु कसा काय या शेतामध्ये आला असे बोलुन शिवीगाळ केली त्यास हटकले असता त्याला काठीने मारहाण केली त्यामुळे फिर्यादीच्या उजव्या हाताच्या ढोपरावर व डाव्या पायाच्या पोटरीवर मारहान केली अशा फिर्यादी चे रिपोर्ट वरून व मेडी सर्टी वरून सदचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव व मो. क्र. | पोउपनि प्रशांत जंगले पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर. ९६०४७१३०४३ |

**२.**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलमं | ३९८/२०२० कलम ३२४,५०४ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | शुभम अशोकराव दरोळी वय २४ वर्ष बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा |
| घटनास्थळ | राम मेघे कॉलेज च्या पाठीमागे जुनी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | ०७/०६/२०२० चे ०८:०० वा |
| दाखल ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १५:१४ वा |
| आरोपी /जखमी चे नाव व पत्ता | मथंन मनोहरराव दरोळी वय २२ वर्ष रा. बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याचे शेतामध्ये उभा असतांना यातील आरोपी ने हजर येवुन फिर्यादीस म्हटले की तु माझे शेतामध्ये कशाला आला वरून फिर्यादीस शिवीगाळ केली व काठीने मारहाण केली त्यसामुळे फिर्यादीच्या पाठीला व उजव्या पायाच्या पोटरीवर मार लागला अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरून व मेडीकल सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव व मो. क्र. | पोउपनि प्रशांत जंगले पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर. ९६०४७१३०४३ |

**३.**

| | |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | **पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर** |
| **अप क्र. व कलम** | **अप क्र. ५३१/२०२० व कलम २७९,३०४(अ) भादवी सहकलम १३४ मोवाका** |
| **फिर्यादि नाव व पत्ता** | **अनिरूध्द विलासराव दवाडे वय २७ वर्ष धंदा- पत्रकारीता, रा. पिंपळखुटा अर्मळ अमरावती** |
| **घटनास्थळ** | **अक्षय अर्मळ यांचे शेतात उत्तर बाजुस रस्त्यावर अमरावती मार्डी रोडवर** |
| **घटना ता. वेळ** | **दि. ०६/०६/२०२० चे २२.०० वा.** |
| **दाखल ता. वेळ** | **दि. ०७/०६/२०२० चे ०३.३९ वा.** |
| **आरोपी** | **अज्ञात वाहन चालक** |
| **आरोपी अटक आहे किंवा नाही** | **नाही** |
| **मृतकाचे नाव** | **अंकित विलासराव दवाडे वय २५ वर्ष रा. पिपळखुटा अर्मळ ता. जि. अमरावती** |
| **हकीकत** | **हकीकत अशा प्रकारे आहे की, वरील नमुद घ.ता.वेळी ठिकाणी यातील मृतक अंकित विलासराव दवाडे वय २५ वर्ष रा. पिंपळखुटा अर्मळ ता. जि. अमरावती हा त्याचे बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम एच २७ ए क्यु ८५७५ ने अमरावती वरून गावी पिंपळखुटा येथे येत असता त्यास पाठीमागुन कोणातरी अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवुन धडक मारली त्यामुळे तो जखमी झाला त्याला इर्विन दवाखाना येथे उपचाराकरीता नेले त्याचे कानातुन रक्त निघत होते त्यास डॉ. सा यांनी तपासनी केली असता त्यास मृत घोषीत करून त्याचे प्रेत पि एम करीता इर्विन शवागार येथे ठेवण्यात आले आहे . माझ्या भावाला अज्ञात वाहन चालकाने धडक मारल्याने तो मरण पावला व वाहन चालक त्याचे वाहन घेवुन पळुन गेला अशा फिर्यादी जबानी रिपोर्ट वरून व नाईट अधिकारी यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला .** |
| **तपासी अधिकारी नाव व मो. नं.** | **स पो नी जिंतेंश कानपुरे पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर** |
| **पो.नि. नाव व मो.नं.** | **पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ९५६१५४१२९२** |

४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ५३२/२०२० व कलम ३०९,३४ भादवी सहकलम ११२,११७महा.पो.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला पोलीस कर्माचारी |
| घटनास्थळ | पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर |
| घटना ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे ११.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे १४.०१ वा. |
| आरोपी | १) भारत बापुराव उके वय ५३ वर्ष २) एक महिला दोन्ही रा. भुतेश्वर चौक मडवी पोस्टे राजापेठ अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांची आज रोजी पोलीस आयुक्त कार्यालय अम. शहर येथे मुख्य गेट वर १०.०० वा ते १२.०० वा पावेतो पहारा ड्युटी असतांना नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी आले असता फिर्यादी यांनी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी आमच्यावर खुप अन्याय झाला आहे आम्हाला मोठ्या साहेबांना भेटायचे आहे. त्यावर फिर्यादी यांनी आरोपीस आज कार्यालय बंद आहे असे सांगितले असता ते समोर गेले आणि आरडाओरड करू लागले व तेथे कर्मचारी जमा झालेत तेव्हा सदर दोन्ही आरोपी यांनी आमच्यावर अन्याय झाला म्हणुन आत्मदहन करतो असे म्हटले व आरोपी क्र. २ हीने पेट्रोल असलेली बाटली काढली तेव्हा तेथील महीला कर्मचारी हीने आरोपी क्र. २ हीचे हातातील पेट्रोलची बाटली हीसकावुन घेतली करीता नमुद आरोपी हे आत्मदहन करण्याचा प्रयत्न करित होते अशा फिर्यादी जबानी रिपोर्ट वरून व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | ए एस आय अरूण मेश्राम ब न ५८६ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ७६२०१९२१५३ |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ९५६१५४१२९२ |

५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ५३३/२०२० व कलम २९४,५०६ (ब) भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे १५.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे १७.२६ वा. |
| आरोपी | संकेत नंदु ढोके वय २३ वर्ष, पंचशिल नगर रहाटगाव अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहणारे असुन त्याचे मागील तिन वर्षापासुन प्रेम प्रकरण सुरु आहे. मागील एक महीण्या पासुन फिर्यादी हीने आरोपी सोबत सबंध तोडले असुन तिचे लग्णाकरिता तीला पाहायला पावने मंडळी येत असल्याने आरोपीला माहीत पडल्या वरुन तो तिला लग्ण करण्याचा तगादा लावत असुन फिर्यादी हीने त्याचे लग्णास नकार दिल्याचे कारणावरुन नमुद घ. ता.वेळी व ठीकानी फिर्यादी ही तीचे मावशी च्या घरी हजर असतांना आरोपी हा त्याचे घरासमोर येवुन फिर्यादीला आवाज देवुन म्हणाला कि, मला तुझ्याशी बोलायचे आहे. असे म्हणुन फिर्यादी व तीची मावस बहीण बाहेर आली असता आरोपी याने फि. ला म्हटले कि, तु माझ्याशी लग्न कर फि. ने नकार दिल्याचे कारणा वरुन व एकदम रागाचे भरात येवुन तु लग्नकशी करते मी पाहुन घेतो अशा अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन जिवानीशी मारण्याच्या धमकी दिली व जोरजोरात ओरडुन निघुन गेला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | स.पो.नि. बिपीन इंगळे पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ८८८८८१८७७६ |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ९५६१५४१२९२ |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ५३४/२०२० व कलम ३२५,२९४, ३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे १६.३० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे २१.०३ वा. |
| आरोपी | १) सलमान चौधरी, २) अक्षय नावाचा मुलगा मुरली झोडापे यांचा भाचा दोन्ही रा. भिम ज्योत मंडळा जवळ फ्रेजरपुरा अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहणारे असुन फिर्यादी यांचे पती त्यांचे घराचे अंगणात कुर्हाडीसाठी लाकडाचा दांडा शिलत असतांना नमुद दोन्ही आरोपी हे नमुद घ. ता. वेळी व ठीकानी आपसात भांडणे करित होते. फिर्यादीचे पतीने ते आपसात भांडण असल्याचे पाहुन कुर्हाडीसाठी लाकडाचा दांडा शिलत असतांना फिर्यादचे पती यांनी लाकडी दांडा अंगणात बाहेर बाजुला ठेवुन दोघांचे भाडणे सोडण्याकरिता गेले असता नमुद आरोपी क्र. १ याने अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन फिर्यादीचे अंगणात असलेल्या कुर्हाडीसाठी तयार करत असलेल्या लाकडी दांड्याने फिर्यादीचे उजव्या पायावर गुडघ्या खाली जोरात मारुन जखमी करुन दुखापत केली व आरोपी क्र. २ याने हातबुक्यांनी फिर्यादीचे डाव्या डोळ्या जवळ मारहान केल्याने फि. चे डाव्या डोळया जवळ सुजन आली व फिर्यादी आणि त्यांचे मुलाने जखमी यास पोलीस स्टेशनला आणुन इर्विन दवाखाना येथे नेले असता डॉ. सा. यांनी उजवा पाय फँक्चर असल्याचे सांगीतले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडी. सर्टी वरून व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | स.पो.नि. बिपीन इंगळे पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ८८८८१८७७६ |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मो नं. ९५६१५४१२९२ |



| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४३९/२०२० कलम ३२३,३२४,३२६,३४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | सुधिर शामराव थोरात वय ३० वर्ष रा. गौतम नगर अमरावती |
| घटनास्थळ | गौतम नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १५-०० वा . ते १६-०० वा. |
| दाखल ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १७-०६ वा. |
| आरोपी | १)अजय रमेश तायडे, २) रोशन मनोज गवई दोन्ही रा. गौतम नगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे घराशेजारी राहतात फिर्यादी नमुद घ.ता.वेळी मासे विकण्याकरीता एरीयात बसले असतांना आरोपीतांनी जुन्या वादावरून फिर्यादीवर अचानक हल्ला केला. यातील आरोपी क्र. ने लोखंडी पाईप आरोपी क्र. याने लाकडी बाशाने फिर्यादीच्या डोक्यात हातावर व पाठीवर मारहान केल्याने फिर्यादीच्या डोक्याला उजव्या हातावर व पाठीवर जखम झाली व डोक्यातुन रक्त निघाले यावरून फिर्यादीस औषध उपचार करून मेडीकल सर्टीफिकेट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला. |
| तपासी अधि. नाव व मो.नं. | पोउपनि गणेश अहिरे, पोस्टे गाडगे नगर अमरावती मोक्र ८३०८९७७२६४ |
| वपोनि मनिष ठाकरे मोक्र | मो. क्र.९८५०१०६०५७ |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४४०/२०२० कलम ३२४, ५०६ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | गौतम नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १५-०० वा. ते १५-३० वा. |
| दाखल ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १७-४२ वा |
| आरोपी | एक महिला |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हि मोहल्यातील भांडण सुरू आहे म्हणुन पाहण्याकरीता गेली असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीला जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यावर व डावे हातावर काठी मारून जखमी केले व मारण्याची धमकी दिली. अशा मेडीकल सर्टिफीकेट वरून व जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला. |
| तपासी अधि. नाव व मो.नं. | पोउपनि गणेश अहिरे, पोस्टे गाडगे नगर अमरावती मोक्र ८३०८९७७२६४ |
| वपोनि मनिष ठाकरे मोक्र | मो. क्र.९८५०१०६०५७ |

९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २००/२०२० कलम ३२४, ५०४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | सैय्यद दानिश सैय्यद रफीक वय २४ वर्षे रा. धरमकांटा वाहेद डी.एड.कॉलेज अमरावती |
| घटनास्थळ | परफेक्ट धरमकांटा वलगाव रोड अमरावती |
| घटना. ता .वेळ | ७/६/२०२० चे १८/०० वा |
| दाखल .ता. वेळ | ७/६/२०२० चे २२/०८ वा |
| आरोपी | वाहन क्र. एम एच ४० एन ५६४० चा चालक |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की वरील घटना ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी चा चालक धरमकांटा कडुन नुर नगर कडे आपले आयशर एम एच २७ बी एक्स ३०४० गाडी वळवीत असतांना सदर ट्रक क्र. एम एच ४० एन ५६४० चे चालकाने हार्न वाजविला असता फिर्यादीचा आयशर चालक याने हाताने थांबविण्याचा ईशारा केला असता सदर ट्रक चालकाने आयशर चालकास लाथा बुक्यांनी मारहाण करुन चालकास ओठावर चाबी मारली व फिर्यादी वाचविण्यास गेला असता फिर्यादीस लोखंडी चाकुने मांडीवर मारुन जख्मी केले व फिर्यादीस शिवीगाळ केली वरुन मेडीसर्टी व जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव व मोनं. | ASI बाळापुरे बनं. ६१७ पोस्टे नागपुरी गेट अमरावती शहर मो.नं. ९८२३४९७००६ |
| वरिष्ठ पोलीस निरिक्षक | व.पो.नि अर्जुन ठोसरे सा. पोस्टे नागपुरी गेट मो.क्र. ९९२३६९४०१२ |

१०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ३८५/२०२० कलम २९४,५०६(ब)भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| आरोपी . | १)दिवाकर शहाजी पवार वय ५० वर्ष २) एक महिला ३)सुरज दिवाकर पवार वय २२ वर्ष ४) एक महिला सर्व रा. पुसदा |
| ०घटनास्थळ | ग्राम पुसदा |
| घटना.ता.वेळ | ०६/०६/२०२० चे १३/३० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | ०७/०६/२०२० चे १६/१९ वाजता |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात राहणारे असुन आरोपी हे अवैध देशी दारु ची विक्री करतात नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील मुद ग्राम रक्षक दलाच्या महीलांनी आरोपी कडुन अवैध दारुने भरलेली पिशवी पकडली असता आरोपीने ग्राम रक्षक दलाच्या सर्व महीलांना अश्लील शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे लेखि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि विनोद चव्हाण पो स्टे वलगांव मो क्रं. |
| पो.स्टे प्रभारी अधिकारी | पो.नि श्री .आसाराम चोरमले सा. पो.स्टे वलगाव अमरावती शहर.मो.क्र.९८३४४८५६२९. |

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | अप क्र ३८२/२०२० कलम ३६३ भादवि |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | अमरावती |
| घटना ता. वेळ | ७/६/२०२० चे १६.०० वा |
| दाखल ता. वेळ. | ७/६/२०२० चे २०.४७ वा |
| आरोपी | निशान गुप्ता वय २५ रा मसानगंज कडबी बाजार अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फीर्यादीची मुलगी वय १९ रा. अमरावती ही घरुन कोणालाही काहीही न सांगता निघुन गेली तिचे निशान गुप्ता वय २५ यांचे सोबत प्रेम संबंध असल्याने तिला त्याने फुस लावुन पळवुन नेले असावे अशा फीर्यादीचे जबाणी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अमलदार | पोउपनी मापारी मो क्र ९४२००२५८६५ पोस्टे राजापेठ अम.श. |

भाग -६ गुन्हे बाबत-१

| पोलीस स्टेशा | वलगांव |
|---|---|
| अप क्र. व कलम | ३८६/२०२० कलम २०,२२ गुंगी कारक औषधीद्रव्य आणी मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फ पो.नि. बाबाराव दिनकरराव अवचार वय ४१ वर्ष रा.पोलीस स्टेशन वलगांव |
| आरोपी . | १)मो.सीद्दी मो.फारुक वय २४ वर्ष रा. पठाण चौक अमरावती २)सोहेब खॉन हसन खॉन वय २६ वर्ष रा पठाण चौक अमरावती ३)अनुश सतीश नवगीरे वय १८ वर्, रा परतवाडा ४)सलीम मुल्ला मुजफ्फर मुल्ला वय ३५ वर्ष रा.गुलीस्ता नगर अमरावती |
| ०घटनास्थळ | पोलीस स्टेशन समोर वलगांव |
| घटना.ता.वेळ | ०७/०६/२०२० चे १५/२० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | ०७/०६/२०२० चे १९/५२ वाजता |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| जप्त माल | १३ पोते एकुन ३२१ किलो किमंत ३१,१०,०००/-रुपये चा गांजा या अंमली पदार्थाची अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळुन आला .वरुन नमुद ट्रक किंमत १२,०००,००/-रुपये व रिकामे प्लँस्टीकचे कॅरेट कि.२९,०००/-रुपये असा एकुन ४४,३९,०००/- रुपयेचा माल |
| गुह्याची कार्यपध्दती | अंमली पदार्थाची अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देश |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळि व ठिकानी गुप्त बातमी दाराचे माहीती वरुन यातील ट्रक क्रं. एम.एच.०४ डी.डी.९०२० या वाहनास नाकाबंदी करुन पंचासमक्ष वाहनांची झडती घेतली असता ट्रक मधे १३ पोते एकुन ३२१ किलो किमंत ३१,१०,०००/-रुपये चा गांजा या अंमली पदार्थाची अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळुन आला .वरुन नमुद ट्रक किंमत १२,०००,००/-रुपये व रिकामे प्लँस्टीकचे कॅरेट कि.२९,०००/-रुपये असा एकुन ४४,३९,०००/- रुपयेचा माल जप्त करण्यात आला .अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात गेतला. |
| तपासी अधिकारी | पो.नि. बाबाराव दिनकरराव अवचार वय ४१ वर्ष रा.पोलीस स्टेशन वलगांव मो क्रं.९५२७५८४६१० |
| पो.स्टे प्रभारी अधिकारी | पो.नि श्री .आसाराम चोरमले सा. पो.स्टे वलगाव अमरावती शहर.मो.क्र.९८३४४८५६२९. |

## जुगार रेड -१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र. ४४१/२०२० कलम १२(अ) म.जु.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | पो.हे.का. महेंद्रसिग प्रधानसिग येवतीकर ब.नं. ८०४, पो.स्टे. गाडगेनगर अमरावती मो.नं. ९५११६०८१२२ |
| घटनास्थळ | पत्रकार कॉलनी खुली जाना अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे १९-२५ वा. |
| दाखल ता. वेळ | दि. ०७/०६/२०२० चे २२-१२ वा. |
| आरोपी | १.अखिल हरिष त्रिकोट रा. सिंधी चौक अम. २) गुलशन हरिष त्रिकोट रा. सिंधी चौक अम.,३) सुधेश महेशकुा दलवानीरा. रामपुरी कॅम्प अम., ४) योगेश सुरेश सुंदरानी रा. रामपुरी कॅम्प अम.,५) तरूण जेठानंद दुरगाई रा. क्रिष्णानगर अम. ६) कुणाल रघुमल सुंदरानी रा. रामपुरी कॅम्प अम., ७) प्रतिक मुकेश मोटवानी रा.सिंधी चौक अम. |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | जामीनावर रिहा वेळ २३-०० वा. |
| मिळाला माल | नगदी १२१६० रू. व जुगार खेळातील ५२ ताशपत्ते कि.अं. २० रू. असा एकुण १२१८० रू. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुदग घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीला गुप्त बातमीच्या आधारे यातील पंच व पो.स्टॉप सह नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता नमुद सात हि आरोपीतांच्या ताब्यातुन जुगार खेळातील नगदी १२१६० रू. व जुगार खेळातील ५२ ताशपत्ते कि.अं. २० रू. असा एकुण १२१८० रू. चा माल पंचासमक्ष जप्त केला. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधि. नाव व मो.नं. | पोउपनि पंकज ढोके , पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर मो.नं. ८८३०३३३५७४ |
| वपोनि मनिष ठाकरे मोक्र | मो. क्र.९८५०१०६०५७ |

## प्रोव्हीशन रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नांदगावपेठ |
| अप क्र. व कलम | १६२/२०२० कलम ६५ (ई) म.दा.का |
| फिर्यादि नाव व पत्ता | प्रमोद खरबडे बं. ान. ७७५ नांदगाव पेठ |
| घटनास्थळ | मिलींद नगर रहाटगाव अमरावती |
| घटना ता. वेळ | ०७/०६/२०२० चे रात्री ११/००वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | ०७/०६/२०२० चे १३.५९ वा |
| आरोपी | भिमराव विठुजी झिंगारे वय ५२ रा. मिलींद नगर रहाटगाव अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | आहे ( समंस पत्रावर सोडण्यात आले ) |
| जप्त माल | १२ देशी पावट्या असा कि अं ७२०/- चा माल |
| गुन्हयाची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदारा कडुान माहीती मिळाली की मिलींद नगर रहाटगाव अमरावती येथे झोपडपट्टी येथे एक इसम बाँबी संत्राची विक्री करीत आहे सदर घटनास्थळावर जाऊन पौहणी केली असता आरोपी विक्री करीत असतांना मिळुन आला तर जागीच त्याला पकडले असता नाव विचारले असता भिमराव विठुजी झिंगारे वय ५२ रा. मिलींद नगर रहाटगाव अमरावती असे सांगीतले त्याच्य ताब्यातुन १२ देशी पावट्या असा कि अं ७२०/- चा माल मिळुन आला त्या पैकी १८० मिली सीए सँम्पल साठी काढली बाकी पंचासमक्ष घटनास्थळावर सील केली अशा फिर्यादी च्या रिपोर्टवरुन आरोपीचे कृत्य हे कलम ६५ (ई) प्रमाणे होत असल्याने त्याच्या विरुध्द सदर गुहा दाखल झाला. |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | प्रमोद खरबडे बं. नं. ७७५ नांदगाव पेठ |
| पो.नि. चव्हाण साहेब | ८२०८७०३९६५ |